महाराष्ट्र शासन
# शासकीय विधी महाविद्यालय
"ए" रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२०.

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४१७०७ Website- www.glcmumbai.com Email id- principal@glcmumbai.com

क्रमांक -शाविम/आस्था/२०२३-२४/291 दिनांक- १५/०२/२०२४

## दरपत्रक सूचना

मा. प्राचार्य व निर्लेखन समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्यावतीने संगणक, प्रिंटर्स इ. इलेक्ट्रॉनिक साहित्य निर्लेखित करण्यासाठी पात्र, अनुभवी आणि अधिकृत संस्था / कंपनी इत्यादींकडून मोहोरबंद लिफाफ्यांमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रकधारकांनी सदर निर्लेखित करण्यात येणाऱ्या साहित्याची माहिती आणि तांत्रिक तथा अतांत्रिक फॉर्म या महाविद्यालयाच्या कार्यालयामधून उपलब्ध करुन घ्यावेत. याबाबतच्या अटी व शर्तींचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

## अटी व शर्ती

१. दरपत्रकाचा फॉर्म भरुन शासकीय विधी महाविद्यालय, "ए" रोड, चर्चगेट, मुंबई- ४०० ०२० येथे महाविद्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. २२/०२/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावा. त्यांनतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.

२. मोहोरबंद लिफाफ्यावर **"शासकीय विधी महाविद्यालय येथील संगणक, प्रिंटर्स इ. इलेक्ट्रॉनिक निर्लेखित साहित्य विकत घेणे"** असे लिहिणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, दरपत्रक फॉर्म व कागदपत्रे मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सादर करावेत. अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३. दरपत्रक फॉर्मवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे. तसेच दरपत्रकधारकाकडे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे Authorization Certificate असणे आवश्यक आहे.

४. मोहोरबंद लिफाफ्यावर E-mail id तसेच भ्रमणध्वनी / दुरध्वनी क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा. दरपत्रकाचा मोहोरबंद लिफाफा उघडतेवळी दरपत्रकधारक स्वतः किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

५. दरपत्रक फॉर्मचे रु. १००/- (ना-परतावा) शुल्क महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये भरल्यानंतरच दरपत्रक फॉर्म मिळेल.

६. एका दरपत्रकधारकास एकच दरपत्रक सादर करता येईल.

७. कोणतेही एक अथवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा किंवा संपुर्ण प्रक्रिया पुर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार प्राचार्य व निर्लेखन समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहे.

८. प्राप्त दरपत्रकांमधून पात्र दरपत्रकधारकाची निवड संबंधित कामासाठी झाली व त्याने काही कारणास्तव कार्यादेश स्विकारण्यास नकार दिला तर त्यापुढील कार्यवाही करण्याचा अधिकार प्राचार्य व निर्लेखन समिती, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई राखून ठेवत आहेत.

९. त्याचप्रमाणे दरपत्रकधारकाशी अनुबंध झाल्यानंतर त्याने आपले काम विहित पध्दतीने न केल्यास किंवा दिरंगाई केल्यास सदर दरपत्रकधारकास देण्यात आलेले कार्यादेश तात्काळ रद्द करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

१०. दरपत्रकाचे फॉर्म शासकीय विधी महाविद्यालय, "ए" रोड, चर्चगेट, मुंबई च्या दुसऱ्या मजल्यावरील कार्यालयामध्ये दि. २२/०२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मिळतील.

११. दि. २३/०२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता दरपत्रके उघडण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

१२. दरपत्रकधारकाने सर्व साहित्याची पाहणी करुनच दरपत्रकामध्ये रक्कम भरावी.

१३. सदर कामाचे कार्यादेश दरपत्रकधारकास प्राप्त झाल्यास त्याने निर्लेखित साहित्याची दरपत्रकामध्ये नमूद केलेली सर्व रक्कम महाविद्यालयातील रोख शाखेमध्ये त्वरीत भरावी व साहित्य उचलण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि. २७/०२/२०२४ पर्यंत करण्यात यावी, याची नोंद घ्यावी.

AAVaidya 15/02/24

डॉ. अस्मिता वैद्य,
प्राचार्य

दिनांक-१५/०२/२०२४.

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'अे' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०.